गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १८४ वा | शुक्रवार २४ नोव्हेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 184 | Date : 24/11/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

## भारतीय सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायमूर्ती फातिमा बिवी यांचं निधन



मुंबई : सर्वोच्च न्यायालयात नियुक्त झालेल्या भारताच्या पहिला महिला जज अर्थात जस्टिस एम. फातिमा बिवी यांचं निधन झालं. त्या ९६ वर्षांच्या होत्या. देशातल्या महिलांसाठी त्या आदर्श ठरल्या. तसंच त्यांची वकिली क्षेत्रातली कामगिरीही उल्लेखनीय ठरली. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती म्हणून जेव्हा त्या निवृत्त झाल्या त्यानंतर त्या तामिळनाडूच्या राज्यपालपदीही विराजमान झाल्या होत्या. राजकीय क्षेत्रातही त्यांनी त्यांच्या कामाचा ठसा उमटवला होता.

केरळच्या पंडालममध्ये राहणाऱ्या जस्टिस बिवी यांनी तिरुवनंतपुरममधून विज्ञान शाखेची पदवी घेतली. त्याआधी त्या पथनामथिट्टा कॅथलिक शाळेत होत्या. त्यानंतर त्यांनी सरकारी विधी महाविद्यालयातून वकिलीची पदवी घेतली. १४ नोव्हेंबर १९५० या दिवशी त्या वकील झाल्या. १९५० मध्ये केरळच्या कनिष्ठ न्यायालयातून त्यांनी वकील म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्या वकील म्हणून प्रगती करत गेल्या. मॅजिस्ट्रेट आणि जिल्हा सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशही झाल्या. १९८३ मध्ये त्या उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती झाल्या तर १९८९ मध्ये सर्वोच न्यायालयाच्या न्यायमूर्ती म्हणून त्यांनी नियुक्ती करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या पहिला महिला जज होण्याचा मान त्यांनी मिळवला. आशिया खंडातल्या देशांमधल्याही त्या पहिल्या महिला न्यायमूर्ती ठरल्या. आपल्या निवृत्तीनंतर त्यांनी तामिळनाडूचं राज्यपालपद भुषवलं. । **पान २ वर**

# बाविठ्ठला..! राज्यातील सर्व जनतेला सुखी व समाधानी ठेवून सर्वांच्या मनोकामना पूर्ण कर

### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता विकास संवर्धन आराखड्याच्या पहिल्या टप्प्यातील २६ कोटींच्या कामाचे भूमिपूजन संपन्न





पंढरपूर/प्रतिनिधीः बाविठ्ठला! राज्यातील सर्व जनतेला सुखी समाधानी ठेव. शेतकरी, कष्टकरी समाजासमोरील संकटे दूर करून त्यांना समाधानी ठेव. समाजातील सर्व घटकांच्या मनोकामना पूर्ण करण्याची शक्ती व आशीर्वाद द्यावा, असे साकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्तिकी एकादशीनिमित्त आयोजित शासकीय महापुजेच्याप्रसंगी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीची कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस व सौ. अमृता फडणवीस यांच्या हस्ते आज पार पडली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. तानाजी सावंत, कामगार मंत्री सुरेश खाडे, आमदार सर्वश्री राणा जगजितसिंह पाटील, रणजीतसिंह मोहिते पाटील, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, कोल्हापूर पोलीस परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय अधिकारी गजानन गुरव व अन्य मान्यवर उपस्थित होते.उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भागवत धर्माची पताका पिढ्यानुपिढ्या वारकरी संप्रदाय पुढे घेऊन जात आहे. कितीही आक्रमणे झाली, संकटे आली तरी हा वारकरी संप्रदाय कधीही थांबला नाही, त्यांच्या पावलांनी नेहमीच पंढरीची वाट धरली. महाराष्ट्र धर्म वारकऱ्यांनी जिवंत ठेवला असून महाराष्ट्र धर्माचा पाया ज्ञानेश्वर माऊलींनी घालून दिला तर संत तुकाराम महाराजांनी त्यावर कळस चढवला. सर्व संतांनी त्यांच्या विचार व आचरणातून सामान्य माणसाला असामान्य बनवले. अनेक पिढ्या बदलल्या परंतु भागवत धर्मावरील लोकांची श्रद्धा बदलली नाही, असे त्यांनी सांगितले.

मागील वर्षीच्या कार्तिकीला श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता संवर्धनाची संकल्पना मांडली होती, तर या कार्तिकीला मंदिर संवर्धन विकासासाठी मंजूर करण्यात आलेल्या ७३ कोटीच्या निधीतून पहिल्या टप्प्यातील २६ कोटीच्या विविध संवर्धन विकास कामांचे भूमिपूजन आज करण्यात आले, त्याबद्दल समाधान वाटत असून हे काम अत्यंत वेगाने व उत्कृष्ट दर्जाचे होईल यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व संबंधित ठेकेदार यांनी काळजी घेतली पाहिजे, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी दिले.

दुसऱ्या टप्प्यातील कामांनाही लवकरच सुरुवात करण्यात येणार असून श्री क्षेत्र पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची कामे सर्वांना सोबत व विश्र्वासात घेऊन करण्यात येतील. विस्थापित व्हावे लागणार नाही तसेच कोणाचेही नुकसान । **पान २ वर**

## एकनाथ शिंदे सरकारचा मोठा निर्णय! राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना १ जुलैपासून ४ टक्के महागाई भत्ता लागू






मुंबई : एकनाथ शिंदे सरकारने राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. १ जुलैपासून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ करण्यात आली आहे. राज्य सरकारने दिलेल्या आदेशानुसार १ जुलै २०२३ पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४२ वरुन ४६ टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्ता वाढ १ जुलै २०२३ ते ३१ ऑक्टोबर २०२३ या कालावधीतील थकबाकीसह नोव्हेंबरच्या वेतनासह रोखीने देण्यात यावी असा निर्णय सरकारने घेतला आहे.

सरकारच्या आदेशात काय नमूद करण्यात आलं आहे?

महागाई भत्त्याची रक्त प्रदान करण्याबाबत विद्यमान तरतुदी आणि कार्यपद्धती त्याचप्रकारे लागू राहिल. यावर होणारा खर्च संबंधित । **पान २ वर**

## ‘पनवती’प्रकरणी निवडणूक आयोगाकडून राहुल गांधींना कारणे दाखवा नोटीस,



नवी दिल्ली : पनवती आणि पाकिट चोर अशी पंतप्रधान नरेंद्र मोदींची तुलना केल्याने काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना निवडणूक आयोगाने गुरुवारी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. राजस्थानमधील एका निवडणूक रॅलीत गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केलं होतं. याबाबत भाजपाने निवडणूक आयोगात धाव घेतली होती. भाजपाच्या तक्रारीची निवडणूक आयोगाने दखल घेतली असून कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. राहुल गांधींनी पंतप्रधानांची तुलना पाकिटामारशी केली. तसंच, पीएम म्हणजे पनवती मोदी अशीही खिल्ली राहुल गांधींनी उडवली होती. पंतप्रधानांनी गेल्या नऊ वर्षांत श्रीमंतांचे १४ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्याचा । **पान २ वर**

## रब्बी हंगाम २०२३ पीक स्पर्धेचे आयोजन ३१ डिसेंबर अखेर अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः कृषी विभागांमार्फत रब्बी हंगाम - २०२३ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासांठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पीकस्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पीकस्पर्धा राबविण्यात येणार असून पीक स्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम दिनांक ३१ डिसेंबर २०२३ असल्याचे कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) दिलीप झेंडे यांनी प्रसिध्दी पत्रकान्व्ये कळविले आहे.

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अश्या प्रयोगशील शेतक-यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतक-यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पीकस्पर्धेचे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विजेते निवण्यात येतील.वंचित/ दुर्लक्षित तसेच पौष्टिक तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादन तंत्रज्ञानात वाढ होण्याची आवश्यकता विचारात घेऊन तसेच जास्तीत जास्त शेतकरी पिक स्पर्धांमध्ये सहभागी होतील या दृष्टीकोनातून रब्बी हंगाम २०२३ पासून पिकस्पर्धा । **पान २ वर**


## राज्यातील शाळांमध्ये आता ‘वाचन चळवळ’, शालेय शिक्षण विभागाची मान्यता



पुणे : राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणात इयत्ता तिसरीच्या ३० टक्केपेक्षा जास्त मुलांना लहान मजकूर, पाचवीपर्यंतच्या ४१ टक्के मुलांना त्यांच्या श्रेणीचा योग्य मजकूर वाचता येत नसल्याचे आढळून आले आहे. मात्र आता हे चित्र बदलण्यासाठी राज्यातील शाळांमध्ये वाचन चळवळ राबवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

विद्यार्थी भाषा नैसर्गिकरित्या शिकतात. मात्र विद्यार्थ्यांनी वाचन जाणीवपूर्वक शिकले पाहिजे. इयत्ता दुसरीमध्ये मुलांना वाचन येणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात विद्यार्थ्यांकडून वाचन होत नसल्याचे राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणातून समोर आले आहे. त्यामुळे २०२६ पर्यंत राज्यातील तिसरीपर्यंतचे प्रत्येक मूल ओघवते वाचन करू शकेल, आठवीपर्यंतचे प्रत्येक मूल शिकण्यासाठी वाचू शकेल हे सुनिश्र्चित करणारी आनंददायी वाचनाची चळवळ निर्माण करण्याच्या उद्देशाने आता राज्यात वाचन चळवळ राबवली जाणार आहे. या वाचन चळवळीत शालेय शिक्षण विभाग, राज्यसरकार, युनिसेफ, रीड इंडिया आणि प्रथम बुक्स या संस्थांचा सहभाग आहे. मुलांना वाचनाची सवय लावण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालकांकडून मार्गदर्शक सूचना तयार केल्या जातील. राज्यातील शासनमान्य शाळा आणि खासगी शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाईल. मात्र खासगी शाळांना पुस्तके। **पान २ वर**

## आवताडे शुगरनेही केली ऊस दरात वाढ, पहिला हप्ता २७११ रुपये देणार असल्याचे चेअरमन संजय आवताडे यांचेकडून जाहीर



मंगळवेढा/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यामध्ये सध्या ऊस दाराची स्पर्धा लागली असून पंढरपूर नंतर मंगळवेढा तालुका ही मागे राहिला नाही अवताडे शुगरने या अगोदर ऊस दराचा पहिला हप्ता २५५१ रुपये जाहीर केला होता मात्र इतर कारखान्यानी जादा दर जाहीर केल्याने यामध्ये अवताडे शुगरने ही मागे न राहता २७११ रुपये पहिला हप्ता जाहीर केला आहेयावेळी आवताडे म्हणाले कि आवताडे शुगर सर्वाधिक दर देणार असा विश्र्वास आमच्या परस्पर शेतकऱ्यांना सुद्धा आहे आम्ही शेतकऱ्यांच्या हितासाठी कारखाना उभारला असून आमची बांधिलकी शेतकऱ्यांशी आहे उसाची रिकव्हरी अजून चांगली वाढली तर अजून चांगला दर देण्यात येईल असे यावेळी चेअरमन संजय आवताडे यांनी बोलून दाखविले.आवताडे शुगर ने गेल्या वर्षी पहिल्या गळीत हंगामामध्ये एकरकमी २३५० रुपये ऊस दर दिला होता यंदा आवताडे शुगर चा दुसरा गळीत हंगाम असून २७११ रुपये पहिली उचल जाहीर केली आहे.

## राज्यपालांच्या हस्ते मध्य व पश्चिम क्षेत्रीय केंद्रीय राजभाषा पुरस्कार प्रदान



मुंबई : राज्यपाल म्हणून अनेक देशांचे राजदूत व वाणिज्यदूत आपणांस भेटावयास येतात. त्यातील काहींना तर हिंदी भाषा देखील अवगत असते. अनेक देशांमधील विद्यापीठांमध्ये हिंदी भाषा विभाग कार्यरत असल्याचे त्यांच्याकडून समजते. दुर्दैवाने आपणच आपल्या मातृभाषांबाबत उदासीन आहोत. हिंदी चित्रपटातील अभिनेते अभिनेत्री नेहमी इंग्रजीतच बोलतात; हिंदी भाषेत बोलण्यास कचरतात, हे दुर्दैवी असल्याचे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागातर्फे आयोजित क्षेत्रीय राजभाषा संमेलनाचे उदघाटन राज्यपाल श्री. बैस यांच्या हस्ते न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, अणुशक्ती भवन, तुर्भे मुंबई येथे गुरुवारी (दि. २३) झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विविध केंद्रीय संघटना, बँक व उपक्रमांना २०२२- २३ वर्षाचे क्षेत्रीय राजभाषा पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाला केंद्रीय गृह राज्यमंत्री अजयकुमार मिश्रा, राजभाषा विभागातील सचिव अंशुली आर्य, राजभाषा सहसचिव डॉ. मीनाक्षी जौली, न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक भुवनचंद्र पाठक तसेच राजभाषा विभागाचे अधिकारी, कर्मचारी, निमंत्रित उपस्थित होते.

अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळा आपल्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना घरी देखील इंग्रजीतूनच संवाद करण्याचे सांगतात. हिंदी किंवा मराठी भाषेत बोलणाऱ्याकडे हीन दृष्टीने पाहिले जाते. परिणामतः मुले आपल्या मातृभाषेत किंवा हिंदीत बोलण्यास कचरतात, असे राज्यपालांनी सांगितले. आपण राजभाषा संसदीय समितीचे सदस्य म्हणून काम केले आहे, असे नमूद करून जगात भारत एकमात्र देश आहे जेथे आपलीच राष्ट्रभाषा वाचविण्यासाठी समिती नेमावी लागते, असे मत राज्यपालांनी नोंदविले. इस्रायलने हिब्रू भाषा जीवित करुन तिला मातृभाषा बनवले, असे सांगून स्वातंत्र्यानंतर ७६ वर्षांनी देखील हिंदी ही राष्ट्रभाषा न होता राज्यभाषा राहिली, याबद्दल राज्यपालांनी खंत व्यक्त केली. हिंदी भाषा येत नसेल याचा लोकांना न्यूनगंड । **पान २ वर**

# संपादकीय

## सरकारी यंत्रणा..

सर्वसामान्यांना केंद्रीय तपास यंत्रणा कार्यरत असल्याचे वारंवार दिसू लागले आहे. दुर्दैवाने तपास यंत्रणांच्या कारवायांवर नजर टाकल्यावर देशभरात बिगर भाजप पक्षांच्या नेत्यांवर कारवाया होताना दिसत आहेत. भाजपचा झेंडा खांद्यावर घेतला की घोटाळेबाज मंत्री होतो, त्यांच्यामागील चौकशीचा ससेमिरा बंद होतो. अटकेची भीती दूर होते. त्यामुळे केंद्रीय तपास यंत्रणांची विश्वासार्हता कमी झाली आहे. पश्चिम बंगालचे वनमंत्री ज्योतिप्रिय मलिक यांना ईडीने अटक केली. पश्चिम बंगालमध्ये गेल्या दीड वर्षांपासून ईडीच्या कारवाया सुरू आहेत. गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या आरोपावरून पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे नेते ईडीचे मुख्य लक्ष्य आहेत. मलिकांसहीत ईडीने आतापर्यंत तृणमूल काँग्रेसच्या पाच नेत्यांवर कारवाई केली आहे. राजस्थानमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना सत्ताधारी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांच्या निवासस्थानावर ईडीने छापेमारी करत कारवाई केली. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या मुलालाही ईडीने चौकशीचे समन्स बजावले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही ईडीने चौकशीसाठी समन्स बजावले. दिल्लीत आपचे सरकार आहे. या सरकारमधील माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यानंतर ईडीने दिल्लीचे शिक्षणमंत्री सत्येंद्र जैन आणि खासदार संजय सिंह यांना मद्य घोटाळ्यात अटक केली आहे. तमिळनाडूत द्रमुकच्या एका मंत्र्याला अटक करण्यात आली आहे. तेथील काही मंत्र्यांवरही घोटाळ्याचे आरोप असून त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत ईडी विरोधकांच्या ज्या पध्दतीने मागे लागली आहे, त्यावरून ईडीच्या कारवायांकडे संशयाने पाहिले जात आहे. केवळ बिगर भाजपशासित राज्यांमधील सत्ताधारी भ्रष्ट आहेत, असे चित्र सध्या राजकीय क्षेत्रात निर्माण केले जात आहे. भाजपसोबत गेल्यास केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा मागे लागत नाही, हा बिगर भाजप नेत्यांना येत असलेला अनुभव आहे. म्हणूनच 'भाजपमध्ये असल्याने निवांत आणि शांत झोप लागते' हे भाजपवासी झालेले माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे विधान खूप काही सांगून जातात.

# विशेष लेखयोजना 'सारथी'च्या.
# 'सारथी'मार्फत नेट, सेट परीक्षेचे दिले जाते मोफत प्रशिक्षण

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी २०१८ मध्ये छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेची (सारथी) स्थापना करण्यात आली. 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' हे ब्रीद घेवून काम करणाऱ्या 'सारथी' संस्थेमार्फत विविध कल्याणकारी उपक्रम व योजना राबविण्याचे काम केले जात असून या योजनांच्या माहितीवर आधारित क्रमशः लेखमालेचा हा चौथा भाग

महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये सहाय्यक प्राध्यापक पदासाठी राज्य पात्रता परीक्षा अर्थात सेट किंवा राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेट परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. सेट किंवा नेट परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना पीएच.डी. प्रवेश परीक्षेतून सूट देण्यात येते. या परीक्षांचे महत्व लक्षात घेवून 'सारथी'मार्फत राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या प्रवर्गातील लक्षित गटातील उमेदवारांना सेट, नेट स्पर्धा परीक्षापूर्व निःशुल्क प्रशिक्षण देण्यात येत आहे.

सेट स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी दरवर्षी एक हजार उमेदवारांची निवड करण्यात येते, तसेच नेट स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठीही दरवर्षी एक हजार उमेदवारांची निवड करण्यात येते. या प्रशिक्षणाचा कालावधीत ४ महिन्यांचा असून विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षणासोबत दरमहा ८ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण शुल्क हे सारथी संस्थेमार्फत पॅनेलवरील प्रशिक्षण संस्थेस अदा करण्यात येते. सद्यस्थितीत पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील सारथी संस्थेच्या पॅनेलवरील प्रशिक्षण संस्थेमार्फत सेट स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण देण्यात येते.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

प्रशिक्षण घेण्यासाठी अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या प्रवर्गातील असावा. त्याच्याकडे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले महाराष्ट्र रहिवाशी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेला मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीचा दाखला असावा. उमेदवार कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवीधारक असावा तसेच सेट, नेट परीक्षा देण्यासाठी पात्र असावा. त्याच्याकडे शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसीलदार अथवा सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र किंवा ईडब्लूएस प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांकडून जाहिरातीद्वारे ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतात.

प्रशिक्षणासाठी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अर्ज करण्याची संधी

सन २०२३-२४ मध्ये 'सारथी'च्या सेट, नेट स्पर्धा परीक्षापूर्व निःशुल्क प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. https://sarthi-maharashtragov.in/ या संकेतस्थळावर ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत. या संकेतस्थळावर योजनेच्या अटी, शर्ती आणि पात्रता निकषांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

**–तानाजी घोलप, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

# पंढरपूरच्या महाआरोग्य शिबिराला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी वारीनंतर दुसरी मोठी समजली जाणाऱ्या कार्तिकी वारीनिमित्त दि. २२ ते २४ नोव्हेंबर दरम्यान पंढरपूर येथील ६५ एकर परिसरामध्ये आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसीय महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

आषाढी यात्रेत आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांच्या संकल्पनेतून महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ११ लाख ६४ हजार भाविकांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले होते. त्याची नोंद जागतिक बुक रेकॉर्डमध्ये झाली होती. त्यानंतर आता पुन्हा आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्तिकी यात्रेच्या निमित्ताने महाआरोग्य शिबिरास आजपासून सुरुवात झाली आहे. या शिबिरांमध्ये विविध रोगांवर मोफत उपचार आणि आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहेत. त्यामुळे या महाआरोग्य शिबिराला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

या शिबिरासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टर, तज्ज्ञ, तंत्रज्ञ, परिचारिका व कर्मचारी, स्वयंसेवक यांच्यासह सुमारे ३००० मनुष्यबळाचे नियोजन करण्यात आले आहे. रुग्णांच्या सुविधेसाठी १०८ क्रमांकाच्या ७ रुग्णवाहिका ६५ एकर परिसर, उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर आणि इतर ठिकाणी सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे सहा ठिकाणी अतिदक्षता विभाग, तीन हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ११ प्राथमिक उपचार केंद्रे आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सज्ज ठेवण्यात आली आहेत. आरोग्य या महाआरोग्य शिबिरात भाविकांना कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत घेण्यात येत आहे.



या महाशिबिरातून नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, हाडांची तपासणी, ईसीजी व सोनोग्राफी तपासणी, रक्त तपासणी, उच्च रक्तदाब, त्वचारोग, दंतरोग, संसर्गजन्य रोग (क्षयरोग, कुष्ठरोग), कॅन्सर यांसारख्या रोगांवर मोफत उपचार करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे रुग्णांना चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. ज्या वारकऱ्यांना शस्त्रक्रिया व सुपरस्पेशालिटी सेवेची आवश्यकता भासेल, त्यांची स्वतंत्रपणे यादी करून, सर्वांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.या महाआरोग्य शिबिरासाठी भैरवनाथ शुगर्स व जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे स्वयंसेवक सक्रिय योगदान देत आहेत .

पान १ वरुन

## बाविठ्ठला..! राज्यातील सर्व

होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. चंद्रभागा नदी अविरत पणे वाहत राहिली पाहिजे यासाठी नदी संवर्धनाचे सर्व उपाययोजना करण्यात येतील. नदी स्वच्छ राहिली पाहिजे यासाठी नदी पात्रात नदी काठावरील सर्व गावातून येणारे पाणी हे स्वच्छ करूनच नदीत येईल यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत असेही त्यांनी सांगितले.

यावेळी उपमुख्यमंत्री फडवणीस यांनी कार्तिकी एकादशी निमित्त राज्यातील सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या. तसेच यात्रा कालावधीत जिल्हा प्रशासन व मंदिर समितीने भाविकांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधा बद्दल त्यांनी कौतुक केले.

नाशिक जिल्ह्यातील श्री. बबन विठोबा घुगे व सौ. वत्सला बबन घुगे ठरले मानाचे वारकरी

कार्तिकी एकादशी यात्रा २०२३ निमित्त गुरुवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणाऱ्या शासकीय महापूजेच्या वेळी उपस्थित राहणाऱ्या मानाच्या वारकरी निवडीसाठी दर्शन रांगेतून माळकरी भाविकांची निवड करण्यात आलेली आहे.नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी तालुक्यातील माळेदुमाला येथील शेतकरी श्री. बबन विठोबा घुगे व सौ. वत्सला बबन घुगे या दांपत्याची मानाचे वारकरी म्हणून निवड करण्यात आलेली आहे. हे शेतकरी दाम्पत्य मागील पंधरा वर्षापासून नियमितपणे वारी करत आहे. या दाम्पत्याला उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्य परिवहन महामंडळाचा वर्षभर मोफत एसटी पास देण्यात आला.प्रारंभी मंदिर समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस, मानाचे वारकरी व उपस्थित सर्व मान्यवर यांचा सत्कार करण्यात आला.

मंदिर समितीचे सहअध्यक्ष औसेकर महाराज यांनी प्रास्ताविक केले. कार्तिकी यात्रा निमित्त शासन व प्रशासनाने वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा बाबत आभार मानले. श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आषाढीला किमान १२ तास लागत होते तर योग्य नियोजन करून कार्तिकी यात्रेला हा कालावधी आठ ते नऊ तासापर्यंत आलेला आहे अशी माहिती त्यांनी दिली. तसेच मंदिर समितीच्या प्रलंबित प्रश्नाबाबत सहकार्य करावे अशी मागणी त्यांनी केली. मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्र्वर देशमुख जळगावकर महाराज यांनी आभार मानले.

## एकनाथ शिंदे सरकारचा मोठा निर्णय!..

शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागवण्यात यावा.अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्याबाबतती संबंधित लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

महागाई भत्ता वर्षभरातून दोनदा वाढत असतो. १ जानेवारी आणि १ जुलै. मात्र निर्णय उशिरा घेतला जातो. आज जो शासन आदेश काढण्यात आला आहे त्यात १ जुलै पासून चार टक्के महागाई भत्त्यात वाढ असं नमूद करण्यात आलं आहे. शासकीय, निमशासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी या सगळ्यांना हा महागाई भत्ता मिळणार आहे. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर अशा चार महिन्यांच्या थकबाकीसह हा महागाई भत्ता कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. महागाई भत्ता आधी केंद्र सरकार जाहीर करतं आणि नंतर राज्य सरकार निर्णय घेतं.

## रब्बी हंगाम २०२३ पीक

तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येणार आहे.

स्पर्धेचे पात्रता निकष – स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वतःच्या नांवे जमीन असंणे व ती जमीन तो स्वतः कसत असंणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल . पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थींच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

स्पर्धेतअर्ज करण्यासाठी आवशयक कागदपत्रे: – विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास), पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकितप्रत,स्पर्धेसाठी प्रवेश शुक्ल पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु. ३०० व आदीवासी गटासाठी रक्कम रुपये १५० असे असणार आहे. बक्षिस स्वरुप तालुका स्तरावर – प्रथम-रु. ५०००/-, द्वितीय -रु. ३०००/-, तृतीय -रु. २०००/- तर जिल्हास्तरावर – प्रथम-रु. १००००/-, द्वितीय -रु. ७०००/-, तृतीय -रु. ५०००/-व राज्यस्तरावर – प्रथम-रु. ५००००/-, द्वितीय -रु. ४००००/-, तृतीय -रु. ३००००/- असे असणार आहे. पीकस्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी किंवा महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in ला भेट द्यावी, असे पत्रकात नमूद आहे.

## राज्यातील शाळांमध्ये आता ..

दिली जाणार नाहीत. उपक्रमात वर्षभरातील काही तारखा निश्र्चित करून शाळेत वाचन वर्ग आयोजित केले जातील. त्यात विद्यार्थी पुस्तकांची देवाणघेवाण करतील. त्याशिवाय शालेय स्तरावर शाळेच्या वेळापत्रकातच साप्ताहिक दोन वाचन तासिकांचा समावेश करणे, गोष्टींचा रविवार उपक्रमाअंतर्गत दर शनिवारी ई-पुस्तके उपलब्ध करून देणे, आनंदाचा तासअंतर्गत 'ड्रॉप एव्हरीथिंग अँड रीड' या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या वेळापत्रकात किंवा शाळा सुरू होण्यापूर्वी १५-२० मिनिटे शिक्षक आणि मुलांसाठी कथा पुस्तके वाचण्यासाठी आनंदाचा तास वेळा पत्रकात समाविष्ट केला जाईल. मुलांना वाचनाच्या संधी उपलब्ध करण्यासाठी लोकसहभाग, मुलांना वाचनाचे महत्त्व समजावणे, मराठी भाषेचा नवीन वाचक वर्ग तयार करणे, मुलांवर चांगले संस्कार करणे, कथा, कादंबऱ्या, कविता, नाटकांतून रसास्वादाची दृष्टी निर्माण करण्याचा या चळवळीचा उद्देश आहे. या उपक्रमासाठी ब्रँड ॲम्बेसिडरची नियुक्ती केली जाणार आहे.

## राज्यपालांच्या हस्ते मध्य व पश्चिम

येत नाही. परंतु इंग्रजी भाषा येत नसेल तर न्यूनगंड दिसून येतो, असे सांगून देशांतर्गत विमान प्रवासात हिंदीचा वापर केला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. लॉर्ड मेकॉले यांनी देशावर थोपलेली वैचारिक गुलामगिरी जावी व हिंदी भाषा लोकभाषा व्हावी यासाठी हिंदी भाषेत इंग्रजीला पर्यायी असे सोपे शब्द उपलब्ध करून द्यावेत, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.

भाषा हा कोणत्याही राष्ट्राचा आणि समाजाचा आत्मा असतो. त्यातून तो देश संवाद साधतो आणि आपल्या भावना व्यक्त करतो. आचार्य विनोबा भावे यांनी आपल्या भूदान चळवळीच्या यशाचे श्रेय हिंदीला दिले होते. महात्मा गांधींनी 'हिंदुस्थानी' भाषेला सर्वोच्च स्थान दिले, असे सांगून जोपर्यंत लोक आपल्या मातृभाषेत विचार व्यक्त करीत नाहीत, तोवर कोणत्याही देशात स्वतंत्र विचारसरणीचा विकास शक्य होत नाही, असे राज्यपालांनी सांगितले. भारतात बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषा या 'राष्ट्रीय भाषा'च आहेत. त्यांच्यामध्ये भाषांमध्ये कोणताही संघर्ष नाही, तर त्या परस्परांना पूरक आहेत, असे श्री. बैस यांनी सांगितले.

सध्याच्या युगात प्रगतीसाठी तांत्रिक, वैज्ञानिक, व्यावसायिक आणि विविध विषयांचे अद्ययावत ज्ञान आवश्यक आहे. त्यासाठी भारतीय भाषांमधील उच्च दर्जाच्या लेखनाला तसेच भाषांतराला प्रोत्साहन द्यावे लागेल, असे राज्यपालांनी सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषांमध्ये शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे. भाषेचा सर्वोत्तम विकास आणि प्रसार उत्स्फूर्तपणे आणि स्वेच्छेने होतो. त्यामुळे सर्वांनी स्वेच्छेने मातृभाषेला प्राधान्य द्यावे असे आवाहन राज्यपाल श्री. बैस यांनी यावेळी केले.

हिंदी ही राजभाषा होण्यात वैधानिक, शैक्षणिक व व्यावहारिक आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करून सन २०४७ पर्यंत आत्मनिर्भर भाषेचे लक्ष्य गाठण्यासाठी सर्वांनी काम करावे, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री श्री. मिश्रा यांनी यावेळी केले.

भारतीय भाषांमध्ये आपापसात कोणतीही प्रतिस्पर्धा नाही. केंद्रीय गृह मंत्रालयातर्फे हिंदी शब्द सिंधू तयार केला असून आज त्यात ३ लाख ७० हजार शब्द जोडले गेले आहेत. हिंदी भाषेच्या प्रचार – प्रसारासाठी राजभाषा विभागाने ६९ मंत्रालयांच्या समित्यांचे गठन केले आहे, असे त्यांनी सांगितले.

जगात १०० पेक्षा अधिक देशांमध्ये हिंदी शिकवली जाते. जगात ४८ देशांत ५ कोटी भारतीय लोक आहेत. हे लोक हिंदीचा प्रचार प्रसार करीत आहेत. नव्या शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्र दिले आहे. कायद्याची प्रवेश परीक्षा हिंदीतून होत आहे. यानंतर वैद्यकीय, अभियांत्रिकी, कायदा या सर्व विषयांमध्ये हिंदी व स्थानिक भाषेचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत असे त्यांनी सांगितले. यावेळी, केंद्रीय विद्यालय संगटन, रायपूर, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड भोपाळ, केंद्रीय उत्पाद सीमा शुल्क, जबलपूर, हिंदुस्थान पेट्रोलियम, मनेरी, बँक ऑफ बडोदा, रायपूर, समुद्री उत्पात निर्यात विकास प्राधिकरण, मुंबई, दीपस्तंभ और दीपपोत महानिदेशालय, मुंबई, आयकर आयुक्त कार्यालय, नागपूर, इंडियन ऑइल, वांद्रे, मुंबई, बँक ऑफ बडोदा, मुंबई बँक, समुद्री वाणिज्य विभाग, मोरमुगाव, मौसम विज्ञान केंद्र, पणजी आदींना मध्य व पश्र्चिम क्षेत्रांचे राजभाषा पुरस्कार देण्यात आले.

## 'पनवती'प्रकरणी निवडणूक ..

आरोपही त्यांनी केला. निवडणूक आयोगाच्या सूचनेमध्ये चउउ तरतुदीचा उल्लेख केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की असत्यापित आरोप किंवा विकृती वर आधारित टीका टाळली पाहिजे. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ नुसार पनवती चा वापर भ्रष्ट व्यवहाराच्या व्याख्येत येतो. तशीच ही अध्यात्मिक निंदा आहे.

कोणत्याही व्यक्तीला पाकिटमार म्हणणे म्हणजे हा केवळ वैयक्तिक हल्लाच नाही तर त्या व्यक्तीचे चारित्र्यहनन करणे होय. तसंच, पनवती शब्द निषेधार्ह आहे. मॅच हरणं किंवा जिंकणं हे व्यक्तीच्या हातात नसून संघाच्या कामगिरीवर अवलंबून असतं. तसंच, पंतप्रधानांनी ५० हजार कोटी रुपयांची कर्जमाफीही केलेली नाही. सर्व बँका भारतीय रिझर्व्ह बँकेच्या देखरेखीखाली काम करतात. आरबीआय ही एक वैधानिक स्वायत्त संस्था आहे, असं भाजपाने निवडणूक आयोगात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटलं होतं. मोदी आडनावप्रकरणी झालेल्या कारवाईमुळे राहुल गांधींना खासदारकी गमवावी लागली होती. त्यानंतर, त्यांच्यावरील गुन्हे मागे घेण्यात आल्याने त्यांची खासदारकी पुन्हा देण्यात आली. आता पुन्हा मोदींच्या चारित्र्याचं हनन केल्याप्रकरणी निवडणूक आयोगाने त्यांना नोटीस बजावली आहे. या नोटिशीला ते काय उत्तर देताहेत हे पाहावं लागणार आहे.

## भारतीय सर्वोच्च न्यायालयाच्या

तामिळनाडू विद्यापीठाच्या त्या व्हाइस चान्सलरही होत्या. १९९० मध्ये त्यांना डी. लिट या पदवीने आणि महिला शिरोमणी या पुरस्काराने गौरवण्यात आलं. तसंच त्यांना भारत ज्योती पुरस्कारही प्रदान करण्यात आला होता. तामिळनाडू राजभवन यांच्या एक्स खात्यावर ही पोस्ट करण्यात आली आहे.

फातिमा बिवी यांना त्यांच्या वडिलांनी त्यांना कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले होते. १९५० मध्ये जेव्हा त्यांनी कायद्याची पदवी घेतली, त्यात त्यांना सुवर्ण पदक मिळालं होतं. बार काउन्सिल ऑफ इंडियाचे सुवर्ण पदक मिळवणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या होत्या. आता वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# थायलँडमध्ये भारतीय बुध्दविहार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र उभारण्याची केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची मागणी

बँकॉक : थायलँड हे बौध्द राष्ट्र आहे. थायलँडमध्ये अनेक बुध्दविहारे आहेत. मात्र थायलँडमध्ये भारतीय बौद्ध संस्कृतीचे बुध्दविहार आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र उभारण्यात यावे. त्यासाठी थायलँड सरकारने जमीन द्यावी अशी मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली.



आज बँकॉक येथील थायलँडचे संरक्षणमंत्री नाम. डॉ.सुतीन कुंगसंग यांची भेट घेवून ना.रामदास आठवले यांनी विविध विषयांवर चर्चा केली. त्यावेळी थायलँडमध्ये भारतीय बौध्द संस्कृतीचे बुध्दविहार आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र उभारण्याची मागणी केली.यावेळी थायलँड प्रधानमंत्री कार्यालयाच्या प्रमुख पी आर ओ डॉ जीब चंत्रास्मी उपस्थित होत्या.

थायलँड मध्ये राहणाऱ्या भारतीयांनी बँकॉक दौऱ्यावर आलेल्या केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या स्वागतासाठी बँकॉक मधील हॉटेल रेडिसन येथे स्नेहभोजन समारंभ आयोजित केला होता.त्या कार्यक्रमास थायलँड चे संरक्षणमंत्री डॉ.मा. सुतीन कुंगसंग आणि थायलँड च्या प्रधानमंत्र्यांच्या पी आर ओ डॉ जीब चंत्रास्मी उपस्थित होत्या. यावेळी ना.रामदास आठवले यांच्या सुविद्य पत्नी सौ. सीमाताई आठवले; पुत्र जित आठवले; युनायटेड बुद्धिस्ट फेडरेशन चे अध्यक्ष अविनाश कांबळे;रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदचे अध्यक्ष चंद्रशेखर कांबळे; बँकॉक मध्ये स्थायिक झालेले भारतीय उद्योजक राज वासनिक आदी मान्यवर उपस्थित होते.

थायलँडमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा ; ग्रंथालय, विपश्यना केंद्र; सभागृह; आदी बाबींचा समावेश असणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र थायलँड मध्ये उभारण्यात यावे अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी केली.

महाकारुणी तथागत भगवान गौतम बुध्दांच्या धम्माचा प्रसार सम्राट अशोक यांनी केला. जगभर बौध्द धम्माचा प्रसार त्यांनी केला. सम्राट अशोकानंतर सर्वात मोठे धम्मचक्र प्रवर्तन भारतात महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांनी भारताला दिलेले संविधान जगातील सर्वश्रेष्ठ संविधान आहे. त्यांनी मानवतेच्या समतेच्या विचारांसाठी उभारलेला मानवमुक्तीचा लढा ; त्यांनी भारतात केलेले धम्मचक्र प्रवर्तन याची जगात नोंद झाली आहे.त्यामुळे थायलँडमध्ये महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय केंद्र उभारले पाहिजे अशी सुचना ना. रामदास आठवले यांनी यावेळी थायलँडचे संरक्षणमंत्री नामदार डॉ.सुतीन कुंगसंग यांना केली.




# शेतकरी कृती समिती यांच्या वतीने ठिय्या आंदोलन सुरू

शिरोळ/प्रतिनिधीः शिरोळ तालुका शिरोळ येथे शेतकरी कृती समिती चे अध्यक्ष रामभाऊ तात्या डांगे यांच्या अध्यक्षतेखाली शिरोळ तालुक्यातील ऊस कारखाने लवकरात लवकर साखर कारखाने चालू करावेत अशी मागणी करत आज दुसऱ्या दिवशी सुद्धा ठिय्या आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामध्ये शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. लवकरात लवकर तोडगा काढून ऊस कारखाने सुरू करावेत अशी मागणी कृती समितीचे अध्यक्ष रामभाऊ डांगे अध्यक्ष यांनी केले आहे. शासनाने आमच्या या आंदोलनाची दखल घ्यावी अशी विनंती केली आहे. ऊस दरवाढीच्या आंदोलनामुळे शेतकऱ्याच्या ऊस वजनामध्ये घट होत आहे. यामध्ये शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. यंदा पावसाने दांडी मारल्यामुळे विहीर , बोअर यांना पाणी कमी आले आहे. यातच या आंदोलनामुळे ऊस गळीत हंगाम पुढे जात आहे. यामध्ये शेतकरी भरडला जात आहे. शासन व कारखानदार यांनी लवकरात लवकर तोडगा काढावा अशी मागणी आता जोर धरत आहे . या आंदोलनामध्ये ऊस उत्पादक, शेतकरी ,कामगार, शेतमजूर , सहभागी होते.यात शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. राजू शेट्टी व सरकार यांनी लवकरात लवकर तोडगा काढावा अशी विनंती रामभाऊ तात्या डांगे यांनी केली. यावेळी बबन चौगुले, शिवाजीराव देशमुख ,अन्वर मुजावर, दरघु गावडे, उपस्थितीत होते.

# वंचित बहुजन आघाडीची मुंबईत 'संविधान सन्मान महासभा'!

## छ.शिवाजी पार्क मैदानावर होणार सभा!

मुंबई/ विजय घनघाव : वंचित बहुजन आघाडीकडून येत्या २५ नोव्हेंबर रोजी संविधान दिनाच्या पार्श्र्वभूमीवर संविधान सन्मान महासभेचे आयोजन करण्यात आले आहे. संविधानाने या देशातील शोषित, वंचित, अल्पसंख्यांक, दलित – आदिवासी, ओबीसी व धार्मिक समुह या सर्वांच्या हक्क अधिकारांचे संरक्षण केले आहे. समता, बंधुता आणि न्यायाची हमी दिली आहे. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान समितीच्या वतीने संविधान सादर केले व संविधान व येणारी परिस्थिती आणि त्यावरील उपाय यावर उहापोह करणारे भाषण केले. त्या भाषणाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन या संविधान सन्मान महासभेचे आयोजन करण्यात आले आहे.



महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यात गेल्या महिन्यापासून वंचित बहुजन आघाडीच्या सभांचा धडाका सुरू आहे. ह्या सभांना लोकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. २५ ऑक्टोबर रोजी अकोला येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला लाखोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती. तर त्यानंतर धुळे, सटाणा या ठिकाणी आदिवासी हक्क परिषद मोठ्या संख्येने पार पडल्या होत्या आणि आता संविधान दिनाच्या पार्श्र्वभूमीवर मुंबईतील दादर येथील छ. शिवाजी महाराज मैदानावर ही महासभा होणार आहे. संविधान दिनाच्या पार्श्र्वभूमीवर होणाऱ्या ह्या सभेला अत्यंत महत्त्व आहे. देशभरात संविधानिक संस्था, लोकशाही धोक्यात असतांना महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणावर संविधानाच्या सन्मानार्थ महासभेचे आयोजन करण्यात आले आहे.

मुंबईभरातून मोठ्या प्रमाणात ह्या सभेसाठी वंचित बहुजन आघाडी आणि संविधान प्रेमी जनतेकडून प्रचार जोरात सुरू असून ही महासभा देशातील संविधान प्रेमी जनतेला एक नवीन दिशा देणारी सभा ठरेल. आम्ही सर्व नागरिकांना आवाहन करतो की, आपण सर्वांनी मोठ्या संख्येने संविधान सन्मान महासभेत सहभागी व्हावे असे अँड. बाळासाहेब आंबेडकर यांनी केले

# श्री विठ्ठल साखर कारखान्यावर कर्मवीर औदुंबर अण्णांची १०० वी जयंती साजरी

पंढरपूर/प्रतिनिधीः वेणू नगर दि २३ पंढरपूर तालुक्यातील वेणू नगर गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे संस्थापक चेअरमन व माजी आमदार कर्मवीर कै औदुंबर रावजी अण्णा पाटील यांची शंभरावी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली

याप्रसंगी कारखाना कार्यस्थळातील कर्मवीर कै औदुंबररावजी अण्णा पाटील यांचे पूर्ण आकृती पुतळ्याची विधीपूर्वक पूजा कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज पंढरपूरचे माजी प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव ड्रॉ जय जी जाधव सर व कारखान्याचे जेष्ठ सभासद मधुकर नाईक नवरे पंचायत समितीचे माजी उपसभापती श्री बाळासाहेब पाटील श्री विठ्ठल हॉस्पिटलचे सचिव श्री अभिजीत राजाराम पाटील यांच्या शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील श्री रंजीत राजाराम पाटील व सर्व संचालक मंडळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला

याप्रसंगी आमदार रोहित दादा पवार यांचे वडील राजेंद्र पवार यांनीही आवर्जून उपस्थित राहून कर्मवीर कै अवराना पाटील यांना आदरांजली वाहिली. यावेळी कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील म्हणाले की कै औदुंबर अण्णा पाटील व्यापारी दृष्टिकोन ठेवून पंढरपूर तालुक्यात आले व त्यांनी सर्वांच्या सहकार्याने विधानसभेत जाण्याची संधी मिळाली व कै यशवंतरावजी चव्हाण व श्री शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचारातून कमी खर्चात श्री विठ्ठल कारखान्याची निर्मिती करून पंढरपूर तालुक्यात कृषी व औद्योगिक क्रांती करून दाखवली कै औदुंबर अण्णांनी अतिशय काटकसर करून स्वभावा लातूर कारखान्याचे विस्तारीकरण करून सातत्याने सोलापूर जिल्ह्यात एक नंबर जावा महाराष्ट्रात सहा नंबरचा दर देऊन कारखान्यात वैभव प्राप्त करून दिले त्यांनी



काही अण्णांच्या जुन्या आठवणींना उजाळा देऊन म्हणाले की आम्हीही कै अवधुमानाच्या पावलावर पाऊल ठेवून कारखान्याचा कारभार करून यापुढे सर्वात जास्त दर देणार असल्याचे त्यांनी सांगितले

# चाँद तारा ग्रुप वतीने टिपू सुलतान यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबीर

सोलापूर/देविदास माने : तळे हिप्परगा राजदिप नगर येथील चाँद तारा ग्रुपच्या वतीने शेर-ए-हिंद हजरत टिपू सुलतान यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होतो. या रक्तदान शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्य सचिन भिंगारे, सामाजिक कार्यकर्ते राजू हौशेट्टी , पतंगे , मौला शेख, मोहम्मद शेख आदींची उपस्थित होती.यावेळी अतहर ब्लड बँक वतीने रक्त संकलित करण्यात आले. रक्तदान शिबिरात ३५ रक्तदात्या सहभाग नोंदविला.रक्तदान यशस्वी पार पाडण्यासाठी मौला शेख, मोहम्मद शेख, जिलानी शेख, सद्दाम शेख, नबीलाल शेख, सलीम शेख, अल्ताफ शेख, असलम शेख, शरीफ शेख, एजाज शेख, रिजवान शेख, शब्बीर शेख, साहिल शेख आदींनी परिश्रम घेतले.



# धनगर समाजाला एसटीचे आरक्षण देऊन त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी



धाराशिव/प्रतिनिधी : धनगर समाजास एसटीचे आरक्षण देऊन त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी ड,खंडेराव चौरे यांच्या नेतृत्वाखाली समाज बांधवांनी जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्याकडे दिनांक २१ नोव्हेंबर रोजी केली आहे. दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले की महाराष्ट्र राज्यामध्ये सुमारे अडीच ते तीन कोटी धनगर समाज अस्तित्वात आहे. डोंगरदऱ्यात राहणारे भटकंती करून उपजीविका भागवणारे धनगर बांधव आजही विकासापासून वंचित आहेत. कित्येक पिढ्या ही मागासलेपणाची झळ सोसत आहेत. भारतीय राज्यघटनेने आरक्षण अंमलबजावणी पासून फारकत घेतली आज तुमच्या हाती धनगर उद्धराची संधी आहे. धनगर समाजाने राज्यातील विविध ठिकाणी आमरण उपोषण केले जिल्ह्यापासून ते गाव खेड्यापर्यंत आंदोलनाचे लोन पसरले आहे. या अनुषंगाने आपण एक बैठक घेतली या बैठकीत मी धनगर आरक्षण अंमलबजावणीसाठी चे पुरावे मांडले. धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. अहिल्यादेवी समाज प्रबोधन संच मुंबईच्या वतीने धनगर आरक्षणासाठी उच्च न्यायालयात दाखल याचिकेत याचिका क्रमांक ४९१९/२०१७ ड. कुंभकोणी यांची कायम नियुक्ती करण्यात यावी. तात्काळ व दैनंदिन सुनावणीसाठी अर्ज दाखल करण्यात यावा. तर मेंढपाळासाठी घोषित केलेल्या १० हजार कोटींच्या सहकार महामंडळाचे जिल्हास्तरीय संस्था स्थापन झाले असून लवकरात लवकर सहकार महामंडळाची घोषणा करून योजना कार्यान्वित करण्यात यावी. स्वतंत्र अध्यक्षाची नेमणूक करणे, तसेच हे आदिवासींना ते धनगरांना याप्रमाणे घोषित केलेल्या १००० कोटी रुपयांच्या २२ योजना पैकी काही योजना प्रभावीपणे राबवल्या गेल्या नाहीत. तर संपूर्ण निधी देखील उपलब्ध झाला नसल्यामुळे आढावा घेऊन उपाययोजना करण्यात यावी. तसेच मेंढपाळावर होत असलेले हल्ले रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा आणून त्यांना संरक्षण देण्यात यावे. त्याबरोबरच महसूल रेकॉर्ड मधील आरक्षित सराई, कुरणे दर आकारणी करून स्थानिक मेंढपाळांना वाटप करण्यात यावे. आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. यावर दिगंबर मैंदाड,धनंजय शिंगाडे, मुकुंद फुले, तानाजी बंडगर, ड, श्रीकांत मैंदाड, धनाजी सातपुते, रामहरी सुतार, लिंबराज डुकरे, ड, मनीषा वाघमारे, श्याम तेरकर, गणेश एडके, बालाजी वगरे, गणेश एडके, प्रवीण पवार, सचिन चौरे, सुरज तांबे, अमोल भोजने, सुरज शिंदे, अच्युतराव शिंदे, गणेश गायकवाड आदींच्या सह्या आहेत..

# मराठा–कुणबी, कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र : न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांनी घेतला अमरावती विभागाचा आढावा

अमरावती : मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती स्थापन केली आहे. या समितीची कार्यकक्षा संपूर्ण महाराष्ट्र राज्य करण्यात आली आहे. समितीला यासंबंधीचा अहवाल सादर करावयाचा असल्याने कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीची नोंद असलेले दस्त ऐवज व कागदपत्रांचा समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती संदीप शिंदे (नि.) यांनी विभागीय बैठकीत आढावा घेतला.

समितीच्या कामकाजाच्या अनुषंगाने राज्यातील महसुली विभागात दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने येथील विभागीय आयुक्त कार्यालयात न्यायमूर्ती श्री. शिंदे यांनी मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदी,

अनुषंगिक बाबींचा व कामकाजाचा आढावा घेतला. विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय, विशेष पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, विधी व न्याय विभागाचे सहसचिव ड. शेखर मुनघाटे, समिती कक्षाचे उपसचिव विजय पोवार, ड. अभिजीत पाटील, कक्ष अधिकारी माधुरी देशमुख यांचेसह पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर इमर विभागांचे प्रमुख अधिकारी यावेळी उपस्थित होते.

न्यायमूर्ती श्री. शिंदे म्हणाले की, अमरावती विभागांतर्गत असणाऱ्या पाचही जिल्ह्यांत कुणबी व मराठा जातीच्या समाजाची लोकसंख्या अधिक प्रमाणात आहे. शासकीय विभागाकडे विशेषत: महसूल विभागाकडे असलेल्या महसुली अभिलेखांच्या सन १९४८ पूर्वीच्या तसेच सन १९४८ ते सन १९६७ कालावधीतील मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदीची तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. तसेच जिल्ह्यातील नागरिकांकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेले पुरावे,

वंशावळी, शैक्षणिक व महसुली पुरावे, संस्थानिकांनी दिलेल्या सनदा, राष्ट्रीय दस्तावेज इ. जुनी अभिलेखे जिल्हाधिकारी कार्यालयातील स्थापित विशेष कक्षाने स्वीकारुन त्याबाबतही अहवाल सादर करण्यात यावेत.

अमरावती विभागातील पाचही जिल्हा प्रशासनाचा याअनुषंगाने कामकाजाचा सविस्तर आढावा न्यायमूर्ती शिंदे यांनी बैठकीत घेतला. मागील पाच वर्षात मराठा, कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र वितरणाचा तसेच विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून अवैध ठरलेल्या प्रकरणांच्या कारणांचा आढावा घेतला. प्रारंभी विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी प्रास्ताविकात कामकाजाची माहिती देऊन विभागात कुणबी जातीच्या नोंदी

आढळलेल्यांची संख्या २०,०६,४१३ असल्याचे सांगितले.यावेळी अमरावती विभागातील पाच जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी माहितीचे सादरीकरण करुन कुणबी जातीविषयक सांख्यिकी आणि केलेल्या कामकाजाविषयी विवेचन केले. यावेळी अधिकाऱ्यांनी प्रकरणांचे निरीक्षण, पडताळणी, तपासणी, वस्तुस्थितीबाबत समिती अध्यक्षांना सविस्तर माहिती दिली.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नीरा नरसिंहपूर येथे घेतले श्री लक्ष्मी नृसिंहाचे दर्शन



पुणे : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक इंदापूर तालुक्यातील नीरा नरसिंहपूर येथे श्री लक्ष्मी नृसिंह मंदिरात श्री नृसिंहाचे दर्शन घेऊन मनोभावे पूजा केली. यावेळी आमदार दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, श्री लक्ष्मी नृसिंह मंदिर समितीचे विश्र्वस्त मंडळ, मंदिराचे मुख्य पुजारी विलास रामचंद्र दंडवते, पुजारी मंडळाचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष श्रीकांत दंडवते, प्रसाद दंडवते, कमलेश डिंगरी तसेच ग्रामपंचायत नीरा नरसिंहपूरचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.कुलदैवत असल्यामुळे श्री लक्ष्मी नृसिंहाचे दर्शन आणि आशिर्वाद घेण्यासाठी वारंवार येत असतो. मध्यंतरी बराच कालावधी गेल्यामुळे दर्शनाची ओढ होती. कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने श्री विठूरायाच्या चरणी पूजेचा योग आला आणि इथेही श्री लक्ष्मी नरसिंहाच्या दर्शनाचा योग आला. त्यामुळे येथे दर्शन घेऊन आनंद झाला, असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.यावेळी मंदिर समितीच्यावतीने पुजारी आणि विश्र्वस्तांनी पुणेरी पगडी घालून उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.

# सामान्य नागरिकांना आरोग्यविषयक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



पंढरपूर/प्रतिनिधीः राज्य व केंद्र सरकारच्या वतीने सामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येत असून त्यांना जीवनात आरोग्याची चिंता वाटू नये, त्यांचा आरोग्यावरचा खर्च कमी व्हावा याकरिता आरोग्यविषयक पायाभूत सुविधा उभारण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ६५ एकर परिसर येथे कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने आयोजित महाआरोग्य शिबिराला दिलेल्या भेटीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, खासदार जयसिद्धेश्र्वर महास्वामी, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. राधाकिसन पवार, भैरवनाथ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रा. शिवाजी सावंत आदी उपस्थित होते.

**आरोग्यविषयक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर**

श्री. फडणवीस म्हणाले, आरोग्यविषयक पायाभूत सुविधा उभारण्याकरीता ५ हजार कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. १४ वैद्यकीय महाविद्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे. आता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची व्यवस्था करीत आहोत. 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियानांतर्गत राज्यातील दोन ते अडीच लाख गृहभेटी देऊन महिलांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. महिलांना आजार होऊच नये याकरीता प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

**सामान्य नागरिकांना ५ लाखापर्यंत मोफत उपचार** प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत नागरिकांवर ५ लाखापर्यंतचे मोफत उपचार करण्यात येत आहेत. त्याच धर्तीवर राज्यातही महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा विस्तार करुन, कुठलीही अट न ठेवता राज्यातील नागरिकांनाही ५ लाखापर्यंतचे मोफत उपचार देण्याचा निर्णय घेण्यात आला. आरोग्य विभागाच्यावतीने 'आरोग्याचा अधिकार' (राईट टू हेल्थ) कायदा तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. हा कायदा तयार झाल्यानंतर सामान्य नागरिकाला कायदेशीररित्या आरोग्य सेवा देणे बंधनकारक होईल.

**महाआरोग्य शिबिराचा सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ**

आषाढी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूर येथे लाखो भाविक येत असतात. त्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्याचे आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत आणि त्यांचे बंधू प्रा. शिवाजी सावंत यांनी महाआरोग्य शिबीर आयोजित करण्याचा धाडसी निर्णय घेतला. सदरचे महाशिबीर पार पडल्यानंतर एक 'महारेकॉर्ड' तयार झाला. त्यामध्ये सुमारे ११ लाख रुग्णांनी विविध तपासण्या करत उपचार प्राप्त करुन घेतले. ज्या रुग्णांना पुढचे उपचार आवश्यक होते, त्यांच्यावर पुढील उपचार करण्यात आले. कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त आयोजित या महाशिबिरात आजपर्यंत सुमारे ४२ हजार रुग्णांनी लाभ घेतला. गरजू रुग्णांवर उपचार देण्यासाठी ही व्यवस्था उभारण्यात आली असून याचा रुग्णांना मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

**कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त आयोजित महाआरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांचे आवाहन**

आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त येणाऱ्या राज्यातील वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी अतिशय कमी कालावधीत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित आयोजित महाआरोग्य शिबिरात ११ लाख ५० हजार रुग्णांची तपासणी करुन उपचार करण्यात आले. या ठिकाणी तपासणीअंती गंभीर आजार असलेल्या रुग्णांवर पुढील योग्य ते उपचार राज्य शासनाच्या दवाखान्यात मोफत करण्यात येत आहेत. या महाशिबिरात अतिदक्षता विभाग, आपला दवाखाना तीनची निर्मिती, परिसरात १२ प्राथमिक आरोग्य केंद्र, ६० सुसज्ज रुगणवाहिका, २ हजार ९०० कर्मचारी, रुग्णाचे नियोजन करण्यासाठी वार रुम कार्यान्वित करण्यात आली आहे. वारकऱ्यांना महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून आरोग्य विभागाच्या सेवा एकाच छताखाली मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी २२, २३ व २४ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक वारकऱ्यांनी या शिबीराचे लाभ घेण्याचे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांनी केले.राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत २२ महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. मोफत उपचार संकल्पनेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रापासून ते जिल्हा रुग्णालयापर्यंत रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येत आहेत. त्यांनी बाह्य व अंतर्रुग्ण विभागात दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या वाढलेली आहे. त्यामुळे रुग्णांचा आत्मविश्र्वास वाढला आहे.

देशाचे प्रधानमंत्री यांनी देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर करण्याचा संकल्प केला असून त्यानुसार राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरवर नेण्याकरिता राज्यातील जनतेचे आरोग्य सुदृढ असले पाहिजे. त्यादृष्टीने येत्या अधिवेशनात 'राईट टू हेल्थ' विधेयक मांडण्याच्या मानस केला आहे. येत्या काळात राज्याचे आरोग्य खाते देशात क्रमांक एकवर नेऊ, असा संकल्प डॉ. सावंत यांनी केला.



## इस बावी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आ.समाधान आवताडे यांच्या हस्ते महापूजा

पंढरपूर/प्रतिनिधी : बोलावा विठ्ठल: पहा विठ्ठल: करावा विठ्ठल: जीवाभाव याच एकादशीच्या प्रारंभी व पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर येथील आमदार अवताडे यांच्या वरती निसिम भक्ती असणारे जनतेने आज कार्तिकी एकादशी निमित्त इसबावी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे महापूजा करून आरती केली .पांडुरंग मायबाप अनेक दुःखे संकटे सगळ्याला बाजूला करून तू तिच्या नंदाने डोक्याचे दिवस आणतो त्याच प्रकारे लोकप्रतिनिधी हा जनतेचा सेवक आहे हे मनी बाळगत जनतेच्या सेवेचा कायम तत्पर असणारे आमच्या दादा श्रींना अधिकाधिक दीर्घायुष्य लाभावे आणि निरंतर जनतेच्या सेवेत त्यांचे जेवण राहावे सुख-समृद्धी मिळावी हीच प्रार्थना या जनतेचे आज पूजा करून केली धन्य आम्ही जन्मा आलो! व दास विठोबाचे झालो!

यावेळी भारत पाटील आणि राजमती पाटील यांच्या ते तुळशी पूजा करण्यात आली यावेळी उपस्थितीत सचिव सचिन साबळे अण्णासाहेब जाधव अनिता पवार ओंकार वाघमारे आनंद काळे विकी शिंदे विनायक डोळे प्रशांत आराधी काशिनाथ थिटे भाजप कार्यकारणी सदस्य सौरभ थिटे अभिमान मोरे संदीप पाटील आणि इसबावी मधील आमदार समाधान दादा अवताडे स्नेह परिवार उपस्थित होता

## दुधनी येथे मुस्लिम युवा संघटनेच्या वतिने सैदप्पा झळकी यांच्या सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे मुस्लिम युवा संघटनेच्या वतीने रिपाइं (आठवले गट)चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी सैदप्पा झळकी यांचे निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला आहे. प्रारंभी दुधनी मुस्लिम समाज संघटनेच्या माझी अध्यक्ष बाबु मोमीन यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आली आहे. या प्रसंगी मुस्लिम समाज युवा संघटनेचे ज्येष्ट हाजीरौप निंबाळकर, सैय्यदसाब शेखजी,बाबु मोमिन,महमदसाब चौधरी,बाबू मोमीन,पेशमाम तोला साब गुलबर्गा,दुधनी रिपाइं शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,इमामशाह मंकानदार,शफीक शिकलगार,आजम शेखजी,इब्राहिम अत्तार,जलील नाकेदार,वसीम बडेखा,महिबुब बिलाड,महीबुब मोमीन,आदम शेखजी,सैयद शेख,रिपाइं मुस्लिम आघाडी दुधनी शहर अध्यक्ष महेदिमिंया जिडगे, महिबुब शेखजी,समीर जिडगे,अली जिडगे, मोसिन मोमीन आदी मुस्लिम युवा संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर व धाराशिव या जिल्हयातील महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेत असलेल्या अनुसचित जमातीच्या विदयार्थ्यांसाठी सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्याचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी बळवंत गायकवाड यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूर अधिनस्त असलेल्या सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील अनुसचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना, अनुसूचित जमातीच्या विदयार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क (फ्रिशीप) शिष्यवृत्ती योजना, राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्था मधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजनेसाठी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज परिपूर्ण व मूळ कागदपत्रासह भरण्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन प्रकल्प अधिकारी गायकवाड यांनी केले आहे.

## सामान्यांना नि:शुल्क आरोग्य सेवेसाठी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांत 'झिरो प्रिस्क्रिपशन पॉलिसी' राबवा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



मुंबई : मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात देण्यात येणाऱ्या सर्व वैद्यकीय सुविधा व औषधोपचार नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी 'झिरो प्रिस्क्रिपशन पॉलिसी' राबविण्यासाठी सविस्तर आढावा घेऊन सर्वंकष अहवाल सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल यांना दिले आहेत. 'झिरो प्रिस्क्रिपशन पॉलिसी' राबविणारी मुंबई देशातली पहिली महापालिका ठरणार असून त्यामुळे आरोग्य सेवा पूर्णतः लोकाभिमुख व नि:शुल्क उपलब्ध होतील.

ही योजना राबविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या औषधे व संसाधने खरेदी प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले आहेत. मध्यंतरी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी के.ई.एम रुग्णालयाला भेट दिली होती. त्यावेळी रुग्ण व नागरिकांशी झालेल्या चर्चेदरम्यान काही त्रुटी निदर्शनास आल्या होत्या. महानगरपालिका रुग्णालयात उपलब्ध औषधे व संसाधनां व्यतिरिक्त नातेवाईकांमार्फत रुग्णांच्या उपचारासाठी खर्च केला जातो.

गरीब रुग्णांवर या खर्चाचा अतिरिक्त बोजा पडतो. आरोग्य उपचारावर होणाऱ्या (आऊट ऑफ पॉकेट एक्सपेंडिचर) खर्चामुळे साधारणतः १० टक्के नागरिक दारिद्र्यरेषेखाली खेचले जातात. राष्ट्रीय स्तरावर विविध संस्थांनी केलेला अभ्यास व संशोधनातून निदर्शनास आल्याचे महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी सांगितले.गरीब रुग्णांना महापालिकेच्या रुग्णालयांमार्फत नि:शुल्क सेवा उपलब्ध व्हावी यासाठी झिरो प्रिस्क्रिपशन पॉलिसी राबविण्याबाबत महानगरपालिकेला निर्देश दिले आहेत. त्यासाठी यासंदर्भात सविस्तर अभ्यास करून अहवाल सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी महानगरपालिका आयुक्त यांना दिले आहेत.

मुंबई महानगरपालिकेमार्फत ४ वैद्यकीय महाविद्यालय, १ दंत महाविद्यालय, १६ उपनगरीय रुग्णालये, ५ विशेष रुग्णालये, ३० प्रसुतिगृहे, १९२ दवाखाने सुरू आहेत. याखेरीज २०२ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना देखील कार्यरत आहेत. या वैद्यकीय व्यवस्थेतील रुग्णालयांमध्ये ७१००, उपनगरीय रुग्णालयामध्ये ४०००, विशेष रुग्णालयात ३००० व इतर अशा एकूण सुमारे १५ हजार रुग्णशय्या आहेत. यामध्ये ५० हजार पेक्षा अधिक रुग्ण दररोज बाह्य रुग्ण सेवेचा लाभ घेतात. तसेच, वार्षिक सरासरी २० लाख पेक्षा अधिक रुग्ण आंतर रुग्ण सेवेचा लाभ घेतात.

## विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून वंचित लाभार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा : जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर



मुंबई : भारत सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांचे लाभ लक्षीत लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने संपूर्ण देशासह मुंबई शहर जिल्ह्यातही विकसित भारत संकल्प यात्रेच्या मोहिमेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व विभागांनी त्यांच्या योजनांची प्रचार - प्रसिद्धीबरोबर नियोजन करुन लाभार्थ्यांची निवड व त्यांना प्रत्यक्षात लाभ मिळवून द्यावा असे निर्देश जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिले.विकसित भारत संकल्प यात्रेच्या आयोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी जयराज कारभारी व इतर अधिकारी उपस्थित होते.विकसित भारत संकल्प यात्रेत केंद्र शासनाच्या योजनांच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी पाच चित्ररथ उपलब्ध असणार आहेत. यामुळे विभागांना त्यांच्या योजनांच्या प्रचार प्रसारासाठी कोणताही खर्च न करता लोकांपर्यंत सहजपणे योजना पोहोचविता येतील. प्रत्येक विभागाने त्यांच्या कोणत्या योजना लाभार्थी केंद्रीत आहे याचे नियोजन करुन त्यासाठी प्रसार साहित्य तयार करावे. मुद्रित व ध्वनिचित्रफित अशा दोन्ही स्वरुपात हे साहित्य तयार ठेवावे.यावेळी योजनांचा लाभ देण्यासाठी नवीन लाभार्थ्यांची नोंदणी आणि पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ वितरित करावा असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. कारभारी यांनी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाने त्यांच्या आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे गोल्डन कार्ड वाटप करावे. मुंबई शहरात ६ लाख ४७ हजार लाभार्थी असून या मोहिमेच्या माध्यमातून हा लक्षांक पूर्ण करावा. कौशल्य विकास विभागाने त्यांच्या लाभार्थ्यांचे अर्ज भरुन नोंदणी करून घ्यावी. तसेच इतर विभागांनी सुद्धा त्यांच्या योजनांच्या लाभार्थ्यांच्या नोंदणी ते लाभ असे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.या बैठकीला जिल्हा क्रीडा अधिकारी अभय चव्हाण, मुंबई महानगर पालिकेचे सह कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. संतोष गायकवाड, सहायक सार्वजनिक आरोग्य अधिकारी डॉ. उपलिमित्रा वाघमारे, कौशल्य विकास विभागाचे संदीप गायकवाड, पीएमजेएवायचे जिल्हा समन्वय अधिकारी धनराज पाटील व तहसीलदार आदेश डफळ उपस्थित होते.



## मतदार नोंदणीसाठी २६ नोव्हेंबर रोजी विशेष शिबीराचे आयोजन

सातारा : मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. या अनुषंगाने २६२ सातारा विधानसभा मतदार संघातील तृतीयपंथी व देहविक्री करणाऱ्या महिला व दिव्यांग व्यक्ती तसेच विमुक्त व भटक्या जमातीमधील व्यक्ती यांची नावे मतदार यादीमध्ये समाविष्ठ होण्यासाठी २६ नोव्हेंबर रोजी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रांताधिकारी सुधाकर भोसले यांनी दिली आहे. या शिबीराचे आयोजन तहसील कार्यालय, सातारा व मतदार संघातील सर्व मतदान केंद्रावर आयोजित करण्यात आले आहे. तरी तृतीयपंथी व देहविक्री करणाऱ्या महिला व दिव्यांग तसेच विमुक्त व भटक्या जमातील व्यक्तींनी उपस्थित राहून आपली नावे मतदार यादीमध्ये समाविष्ठ करावीत, असे आवाहनही श्री. भोसले यांनी केले आहे.

## शिवसेनेचे पहिले जिल्हाप्रमुख बाबूराव वडणे यांचे निधन



सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यात शिवसेना शाखेची सर्वप्रथम स्थापना केलेले आणि पक्षाचे पहिले जिल्हा प्रमुख बाबूराव नागनाथ वडणे (वय ८७) यांचे वृध्दापकाळाने गुरूवारी दुपारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रूपाभवानी हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९६६ साली शिवसेना स्थापन केल्यानंतर त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन बाबूराव वडणे यांनी त्याच सुमारास सोलापुरात शिवसेना शाखा स्थापन करून पक्षाची बांधणी केली होती. पक्षाच्या जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी त्यांच्यावरच सोपविण्यात आली होती. १९८२-८३ पर्यंत ते शिवसेना जिल्हाप्रमुख होते. अलिकडे वृध्दापकाळात त्यांनी सार्वजनिक जीवनातून निवृत्ती घेतली होती. पण शिवसेनेचे पहिले जिल्हाप्रमुख त्यांच्या विषयी शिवसैनिकांमध्ये आदर होता. गेली दोन महिने ते आजारपणामुळे बिछान्यावर खिळून होते. त्यांच्या पश्र्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल उध्दव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे, शहरप्रमुख विष्णू कारमपुरी तसेच एकनाथ शिंदे गटाचे शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे आदींनी तीव्र दुःख व्यक्त करून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली.